# कामोठे पाणी प्रश्नाबाबत सिडकोच्या अधिकाऱ्यांना आमदार प्रशांत ठाकूर यांनी घातला रायगड भवनमध्ये घेराव

पनवेल(प्रतिनिधी) कामोठेतील पिण्याच्या पाण्याची समस्या दूर करण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली भाजपा कार्यकर्ते व सेक्टर २५ मधील शेकडो रहिवाशांनी आज सिबिडी बेलापूर येथे रायगड भवनमध्ये सिडकोचे पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता एस.एन.पाटील यांना त्यांच्या कार्यालयात घेराव घातला. पाईपलाईनव्दारे सुरळीतपणे पाणी पुरवठा होत नाही तो पर्यंत कामोठे येथील सोसायटींना टॅकरव्दारे मोफत पाणी पुरवठा करा, असे निर्देश आमदार प्रशांत ठाकूर यांनी आज सिडकोच्या अधिकाऱ्यांना दिले.

कामोठे शहरात दिवसेंदिवस वाढती लोकसंख्या पाहता होणारा पाणी पुरवठा हा अपुरा आहे. सिडकोकडून कामोठे परिसरातील पाणी पुरवठयासंदर्भात नियोजन करण्यात आलेले नसल्याने सध्या वाढत्या उन्हामुळे लोकांची पाण्याविना गैरसोय होत आहे. वाढती लोकसंख्या लक्षात घेता येथील नागरिकांना योग्य प्रमाणात पाणी मिळाले पाहिजे, यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडकोकडे सतत पाठपुरावा करत आहे.

मागिल महिन्यात १५ दिवसात पाणी पुरवठा सुरळीत करतो तसेच जेथे आवश्यकता आहे तेथे टॅकरदवारे पाणी पुरवठा करतो, असे आश्वासन सिडको पाणी पुरवठा अधिकारी नंदकिशोर निमकर यांनी दिले होते. मात्र ते आश्वासन हवेतच विरल्याने त्याचा जाब आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडकोच्या अधिकारांना विचारला. यावर एस.एन.पाटील यांनी एमआयडीसी, एमजीपी कडून अधिक पाणी साठा उपलब्ध होणार असून जुलै महिन्याच्या अखेरपर्यंत पाईपलाईनव्दारे पाणी पुरवठा सुरळीत होईल, अशी ग्वाही दिली. यावर आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडकोचे अधिकारी फक्त चालढकळपणा करण्याचे काम करून वेळ मारून नेण्याचे प्रयत्न करतात, अशा शब्दात सिडकोच्या सुस्त अधिकाऱ्यांवर नाराजी व्यक्त केली. अनेकदा सांगूनही पाण्याचे ऑडीट सिडकोने केले नाही, त्यामुळे शहराला किती पाण्याची आवश्यकता आहे, हे सिडकोला आजवर समजलेच नाही. पाण्याचा प्रश्न गहन असताना मोघम उत्तर देण्याचेच काम सिडकोच्या अधिकाऱ्यांना करता येते मात्र त्याकडे लक्ष देता येत नाही. नागरिकांना सुविधा न देता स्वतःच्या सोयीचे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना समज द्यावी, अन्यथा त्यांना लोकांच्या रोषाला सामोरे जावे लागेल, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी पाटील यांना ठणकावले.

कामोठे मधील लोकसंख्या पाहता ३५ एमलडी पाण्याची आवश्यकता असताना सिडको का पुरक पाणी पुवठा करत नाही तसेच यापुढेही लोकसंख्येत वाढ होत जाणार आहे, मग तुम्ही नागरिकांना पाणी कसे पुरवाल, असा सवाल आमदार प्रशांत ठाकूर यांनी यावेळी उपस्थित केला. यावर अधिकाऱ्यांनी सारवासारवीची उत्तर देण्याचा प्रयत्न केला. मात्र आमदार प्रशांत ठाकूर यांनी अधिकाऱ्यांना ठणकावून सांगत जो पर्यंत पाईपलाईनव्दारे सुरळीत पाणी पुरवठा होत नाही तो पर्यंत सिडकोने टॅकरदवारे सोसायटींना मोफत पाणी पुरवठा करावा, असे निर्देश दिले. त्याचबरोबरीने रिडींगपेक्षा जास्त बिल आकारणी रद्द करावी तसेच शटडाऊन मेंटेनन्स घेण्यापूर्वी त्या-त्या सोसायटीमधील चेअरमन, सचिवांना वेळेवर कल्पना द्यावी, अशा सुचनाही सिडकोच्या अधिकाऱ्यांना केल्या.

यावेळी कामोठे ग्रामपंचायत सदस्य प्रदीप भगत, गोपीनाथ भगत, महेंद्र भोपी, बबन गडवे, हॅप्पी सिंग, अमोल सैद, रविंद्र गवळी यांच्यासह रहिवाशी शेकडोच्या संख्येने उपस्थित होते.